Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar-431004
Maharashtra (India)
NAAC Re-accredited 'A+' Grade

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे 'अ+' दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
C.O.E. : (0240) 2403200
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
E-Mail : coe@bamu.ac.in

Office : Director, Board of Examinations & Evaluation

कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२५/ 666 दिनांक : ०४.१०.२०२५ 07

**प्रति,**
**प्राचार्य/संचालक**
**सर्व संलग्नित महाविद्यालय/परिसंस्था,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**छत्रपती संभाजीनगर.**

विषय : मा. परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि. १०.०६.२०२५ रोजीच्या बैठकीतील प्रस्तावावरील संमत झालेल्या ठरावानुसार कार्यवाही करणेबाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, मा. परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या मंगळवार, दि. १०.०६.२०२५ रोजी झालेल्या बैठकीतील प्रस्ताव क्र. ११ अन्वये ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२५ च्या परीक्षेपासून खालील नमूद बाबींबाबत संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक यांना रु.५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) दंड आकारण्यात यावा व दंडाची रक्कम प्रस्तुत विद्यापीठाच्या लेखा विभागात भरल्यानंतरच संबंधित परीक्षार्थींचे निकाल घोषित करण्याबाबतची प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव पारित करण्यात आलेला आहे.

१. परीक्षा झाल्यांनतर विद्यापीठाने विहित करुन दिल्याप्रमाणे सिलबंद उत्तरपत्रिकांचे बंडल संकलन केंद्रावर जमा न करणे. (ज्या परीक्षांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन जिल्हा मुल्यांकन केंद्रावर होणार असते त्या सर्व उत्तरपत्रिका).
२. गृह परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे सिलबंद बंडल चुकीने संकलन केंद्रावर जमा करणे.
३. परीक्षेमध्ये गैरप्रकार केल्याप्रकरणी विद्यापीठाने विहित करुन दिल्याप्रमाणे उत्तरपत्रिका संबंधित कक्ष, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, विद्यापीठ परिसर येथे विहित मुदतीत जमा न करणे.
४. परीक्षा केंद्रांकडून परीक्षा झाल्यानंतर उत्तरपत्रिकांच्या सिलबंद बंडलमध्ये चुकीच्या उत्तरपत्रिका व उपस्थित अहवाल सादर करणे किंवा प्रत्यक्ष उत्तरपत्रिका व उपस्थिती अहवाल यामध्ये तफावत आढळणे.
५. ज्या परीक्षा केंद्रांना उत्तरपत्रिका संकलन केंद्रावर जमा करणे अनिवार्य असतांना त्यांनी महाविद्यालयातच पात्र अध्यापकांकडून उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन करुन घेणे.

करिता, उपरोक्त प्रमाणे नोंद घेऊन परीक्षेत कार्य करणाऱ्या सर्व संबंधित अध्यापक, अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

यापत्राची प्रतः कक्ष प्रमुख, सर्व संबंधित कक्ष, राजर्षी शाहू महाराज परीक्षा भवन, विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन सूचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेने दंडाची रक्कम भरल्यानंतरच संबंधित परीक्षार्थींचे निकाल घोषित करण्याबाबत कार्यवाही करावी.